# झपाटलेली हवेली

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B261

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**झपाटलेली हवेली : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

## अनुक्रमणिका

झपाटलेली हवेली / ५
आंधळा न्याय / ६५
तीन मारेकरी / १२९

# झपाटलेली हवेली

# १

अगदीच मरतुकड्या घोड्यावर तो स्वार झाला होता. स्वाराचा चेहरा अगदी घोड्यासारखा दमल्यासारखा वाटत होता. घामाने सर्वांग थबथबले होते.

करोलीहून तो धौलपूरकडे अगदी जवळच्या सरळ मार्गाने जाण्याच्या फंदात पडला होता आणि इतकी वर्षे करोलीच्या रानात काढूनही त्याची चुकण्याची ही पहिलीच वेळ होती. आकाश अगदी ढगाळले होते. त्यामुळे सूर्य पाहून दिशा ओळखण्याचीही पंचाईत झाली होती.

पण हवा अतिशय गरम होती. सूर्य ढगाआड दडलेला असला तरी गरमागरम करून टाकीत होता जमिनीला.

जंगल त्या भागात नव्हते. एक टेकाड पार केले की लगेच दुसरे सुरू व्हायचे एक टेकाड चढून दमलेला घोडा उतार येताच स्वारासारखा हुश्श करायचा आणि टेकाडाचा उतार उतारताना त्याचे नाकीनऊ यायचे.

हे असे अगदी दुपारपासून चालले होते. सूर्य पश्चिमेकडे बराच खाली झुकलेला आहे. कोणत्याही क्षणी अंधार पडायला सुरुवात होईल, असे त्याला वाटत होते.

तो अंधाराला घाबरत नव्हता. रानातील भयाण अशा त्या वातावरणाचा त्याच्यावर कोणताही परिणाम झाला नव्हता. हिंस्रप्राणी श्वापदांनी भरलेल्या त्या रानात गाढ झोपायचीदेखील त्याची तयारी होती.

पण झोपायला जागा तरी हवी होती. कारण त्या भागात सापापासून तो चित्त्यापर्यंत सगळेच घातकी प्राणी होते. अगदी जवळ येऊन शरीराला तोंड

लावीपर्यंत पत्ता लागायचा नाही. नि नरडे फोडीपर्यंत घोड्याच्याही ते लक्षात यायचे नाही.

कुठेतरी एकादे खेडे सापडेल असा विचार करीत तो पुढेपुढे चालला होता. सारखा चहूबाजूला नजर फिरवीत होता. आशा सारखी पुढे पुढे रेटीतच होती. मनात भीती नव्हती नि निराशेचाही स्पर्श झाला नव्हता.

फक्त तो दिवसभराच्या घोडदौडीने पार थकला होता. चार दिवस त्याला झोप नव्हती. चौरंगीत गेल्याशिवाय त्याला नीटशी झोप घेता येणार नव्हती.

घरी लवकर जाण्यासाठीच तर त्याने अंदाजाने हा जवळचा मार्ग शोधून काढला होता. आपल्याला या करोलीच्या रानाची खडान्खडा माहिती होती. ह्या घमेंडीत असलेला उदयसिंह चौहान नेमका त्याच रानात पोहचला होता. आपण कितीही घनदाट रानात अचूक दिशा ओळखून काढू शकतो ही त्याची घमेंड पार जिरली होती.

अंधार पडायला सुरुवात झाली. त्या अंधारात तो बावचळल्यासारखा झाला. एका टेकाडाच्या माथ्यावर थांबून त्याने विचार करायला सुरुवात केली, आपण थांबावे आणि उद्या सूर्य उजाडता उजाडता पुढे जायला सुरुवात करावी हा विचार त्याच्या मनात डोकावला.

आपण उत्तरेच्या रोखाने जात आहोत याची मात्र त्याला खात्री होती. आपण असेच पुढे गेलो तर कदाचित धौलपूरपासून कित्येक कोसावरदेखील या रानातून आपण बाहेर पडू हाच विचार तो करीत होता. तसे झाले तर फारसे काही बिघडल्यासारखे नव्हते.

बहुतेक गावांची त्याला खडान्खडा माहिती होती. अशाच एखाद्या हजार दोन हजार वस्तीच्या गावात आपण पोहचलो तर धौलपूरची दिशा अचूक शोधून काढू याचीदेखील खात्री होती. पण घनदाट अंधारात पुढे जावे कसे असहि त्याला वाटत होते. सभोवताली पाहता पाहताच तो थबकल्यासारखा झाला. दूरवर त्याने अस्पष्टसा मशालीचा उजेड पाहिला. रात्रीच्या वेळी दूरवर पेटणारे दिवेदेखील जवळ आहेत असे वाटले. या दिव्यातून अनेक भास निर्माण होतात हा विचारदेखील त्याच्या मनात आला.

तरीही त्याने त्या मशालीच्या रोखाने थकलेल्या घोड्याला पिटाळायला सुरुवात केली. अंधारात घोडा बिचकत होता. घोडा अतिशय थकलेला



आहे याची जाणीव उदयला होत होती. आपण जी मशाल पाहिली ती जागा लवकर सापडावी यासाठी तो परमेश्वराची प्रार्थना करत होता.

एकदा दिसलेला तो उजेड पुन्हा काही दिसला नाही. पण थांबायचा विचारदेखील त्याने केला नाही. कुठेतरी रानात झोपण्याऐवजी एखादी झोपडी सापडली तर ते त्याला हवेच होते; पण बराच वेळ गेला. तरीही काही सापडले नाही हे पाहून तो गोंधळला. त्यावेळीदेखील तो पूर्वीसारखा एका टेकाडावर थांबला होता. ज्या दिशेला मशालीचा उजेड पाहिला होता. त्याच दिशेला त्याची नजर रोखली गेली. कदाचित पुन्हादेखील तो उजेड दिसू शकेल असे त्याला वाटले.

खरोखरीच पुन्हा तो उजेड दिसला. अगदी जवळ असा. कोणत्यातरी घरातील खिडकीतून बाहेर पडणारा तो उजेड होता. घर आहे याचाच अर्थ गाव आहे याची त्याला जाणीव झाली होती.

कसेबसे त्याने घोड्याला पिटाळायला सुरुवात केली. पण थकलेला तो घोडा उदयच्या मनासारखा धावू शकला नाही. शेवटी मात्र त्याला घोड्याची दया आली. घोड्यावरून त्याने खाली उडी घेतली आणि लगाम हाती घेऊन त्याने चालायला सुरुवात केली. थकलेला घोडेस्वार आणि थकलेला घोडा पायी निघाले. टेकाडावरून खाली आल्यामुळे त्याला घर दिसत नव्हते आणि खिडकीतून बाहेर पडणारा तो उजेडदेखील दिसत नव्हता.

तो थोडासा गोंधळल्यासारखा झाला.

घनदाट अशा रानाने वेढलेल्या टेकाडावर त्याला उजेड दिसत होता. तो उजेड खिडकीतून बाहेर येतो याची पुन्हा एकदा खात्री त्याने केली होती. फक्त ते घर आहे. झोपडी आहे का भलामोठा वाडा आहे हेच त्याच्या डोळ्यांना अजमावता येत नव्हते.

पण ते काय आहे याचा विचार करायची ती वेळ नव्हती.

मुकाट्याने त्याने टेकाड चढायला सुरुवात केली. पण तो बेसावध राहायला मात्र तयार झाला नाही. बुंदीजवळच्या दरीत भयंकर मांत्रिक भेटल्यापासून त्याच्यातील बेफिकीर वृत्ती पार नाहीशी झाली होती. पावलोपावली सावध राहायला त्याने मन त्याला बजावीत होते.

कसाबसा धापा टाकीत घोड्यासह तो टेकाड चढून उभा राहिला आणि अंधुक उजेडात समोर पाहत राहिला. तो एक राजवाडा असावा हे त्याच्या लक्षात आले; पण इथे राजवाडा असेल कसा हादेखील विचार त्याच्या मनात आला. नेमकी हीच जागा आपल्या नजरेतून सुटली कशी? चकित होऊन तो पाहत होता.

– आणि हळूहळू त्या राजवाड्याच्या रोखाने त्याने चालायला सुरूवात केली.

भव्य अशा दाराजवळ तो पोहचला. ते दार किल्ल्याच्या दारासारखे भक्कम होते. हातभर लांबीचे लोखंडी सुळे त्या दाराला लावण्यात आले होते.

हत्तीदेखील त्या दाराला टक्कर देऊ शकणार नाही इतकी चोख व्यवस्था करण्यात आली होती. त्याने दाराच्या बाहेर नीट निरखून पाहिले. जोरात ओरडून बाहेरच्या बाजूला कुणी पहारेकरी असला तर त्याचे लक्ष वेधून घ्यावे हा विचार त्याच्या मनात डोकावून गेला. पण तरीही त्याने स्वत:ला सावरले.

आतील माणसांना सूचना देण्यासाठी ओरडण्याशिवाय दुसरा कोणताही इलाज नाही याची त्याला जाणीव झाली. घंटानाद करणारी दोरीदेखील बाहेर लटकत नव्हती.

घोड्याला त्याच ठिकाणी सोडून तो उजेड असलेल्या खिडकीखाली आला आणि बेलाशक त्याने जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली.

बराचवेळ गेला तरी कुणी त्याला दाद दिली नाही. कंटाळून तो परत वाड्याच्या दारापाशी आला आणि त्याचवेळी त्याचे शरीर शहारल्यासारखे झाले. डोक्यावरचे केसदेखील ताठ झाल्याची जाणीव त्याला झाली. हृदयाचे ठोके वाढले.

– आणि जेव्हा समोरचेच दार करकरले जात आहे हे त्याच्या लक्षात आले तेव्हा क्षणात त्याच्या मनातील भीती नाहीशी झाली. आपली हाक कुणीतरी ऐकलेली आहे हे त्याने ओळखले. अर्धवट उघडलेल्या दाराआड कुणीही दिसले नाही. दार उघडले जाताच मशालीचा उजेड दिसेल अशी जी त्याची अपेक्षा होती ती फोल ठरली.

दाराजवळ अंधार असला तरी आतल्या बाजुला कुठेतरी उजेड आहे हे त्याला जाणवले.



'आत या...' मंजुळ असा स्त्रीचा आवाज त्याच्या कानात शिरला आणि अनामिक भीतीने त्याचे शरीर पुन्हा एकदा शहारल्यासारखे झाले. गोंधळून तो जागच्या जागी थिजून उभाच राहिला. नेमकी कोणती हालचाल करावी याची जाणीव त्याला झाली नाही. कितीतरी वेळ तो अंधारात रोखून पाहत उभा राहिला. पलीकडच्या उजेडामुळे दारात हलणारी अस्पष्टशी छाया त्याच्या नजरेला फक्त स्पर्श करून गेली.

– आणि पुन्हा एकदा त्याला आत येण्याची विनंती करण्यात आली.

गोंधळलेल्या मन:स्थितीत तो दाराच्या अगदी जवळ आला. कसाबसा त्याने स्वत:वर ताबा मिळवला. स्त्रीनेच दार उघडले याचाच अर्थ वाडयात चांगली माणसे राहतात हाच अर्थ त्याने घेतला. कसाबसा तो दाराच्या आणखीन जवळ आला.

'घोडा कुठे ठेवू?' शांतपणे त्याने विचारले.

– आणि उत्तर येण्याऐवजी पुन्हा एकदा दाराची करकर सुरू झाली. दार आणखीन उघडले गेले हे त्याच्या लक्षात आले.

'घोड्याला आत आणा...' त्याच स्त्रीचा आवाज पुन्हा शांत वातावरणात दरवळला. आवाजावरून ती अतिशय सुंदर स्त्री असावी हे त्याने ओळखले आणि घोड्याचा लगाम हातात धरूनच त्याने आत प्रवेश केला.

आत बाहेरच्यापेक्षाही थोडासा उजेड होता. अस्पष्टपणे का होईना तो डोळयाने पाहू शकत होता. ज्या स्त्रीने दार उघडले होते त्या स्त्रीचा चेहरा तो पाहू शकत नव्हता. कारण घुंघट तिच्या हनुवटीखाली आला होता.

'त्या बाजूला घोडा बांधा–' त्या स्त्रीच्या आवाजात नम्रपणा होता. आपली ओळखदेखील नसताना तिने दार का उघडले हाच विचार त्यावेळी उदयच्या डोक्यात घोळत होता. तिला भीती का वाटली नाही असेही त्याला वाटत होते. ज्या ठिकाणी तो घोडयाला घेऊन आला त्या ठिकाणी कोपऱ्यात एक मंद तेलाचा दिवा जळत होता. त्या उजेडात जवळ पंधरा–वीस घोडे त्या ठिकाणी बांधलेले आहेत हे उदयाच्या लक्षात आले होते.

त्याने एका खुंटीला घोड्याचा लगाम बांधला आणि तसाच तो मागे वळला. दार पुन्हा एकदा करकरत असलेले त्याने ऐकले. दाराचा अडसर सरकवला गेल्याची जाणीव त्याला झाली.

'माझ्या मागून या...' ती स्त्री थंडपणे बोलली आणि तिने चालायला सुरुवात केली. तोही मुकाट्याने तिच्यामागून चालू लागला. या स्त्रीला आपली भीती का वाटली नाही हाच विचार तो सारखा करीत राहिला.

जवळजवळ अकरा दालने त्या स्त्रीच्या पाठोपाठ त्याने ओलांडली. पण एकदेखील माणूस त्याला दिसला नाही.

बाराव्या दालनात न शिरता तिने दगडी पायऱ्या चढायला सुरुवात केली. ठिकठिकाणी मंद असे तेलाचे दिवे जळताना त्याने पाहिले. हळूच त्याने तिचा चेहरा पाहण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ते जमले नाही.

जिना चढून ती स्त्री पुन्हा एकदा चालत राहिली. तीन दारे पार करून ती एका बंद दाराजवळ थांबली.

'हे अतिथीगृह-' बंद दार उघडत मंजुळ घंटानाद व्हावा तशी ती बोलली. पण उदयसिंह चौहानच्या तोंडून मात्र शब्द बाहेर पडला नाही.

एवढ्या मोठ्या भव्य अशा वाड्यात फक्त एक स्त्री राहते हे त्याला पटले नाही. तो साधासुधा वाडा नव्हता. राजशाही थाटाची ती हवेली होती. एक एक दालन अतिशय भव्य आणि राजेशाही थाटाचे होते.

'आत या-' स्वत: उघडलेल्या दालनात जात त्या स्त्रीने विनंती केली आणि मुकाट्याने तो आत शिरला. भीतीचा स्पर्शदेखील त्याच्या मनाला झाला नाही. पण त्याच्या मनाचा गोंधळ उडाला. काही धोका झालाच तर हालचाल करायची तयारी त्याने ठेवली होती. एकाच वेळी दोन पिस्तुलांचा उपयोग तो कोणत्याही क्षणी करू शकत होता.

'तू कोण ?' उदयच्या आवाजातून त्याच्या मनातील गोंधळ स्पष्ट झाला.

'तुम्ही अतिशय थकलेले आहात. मध्यरात्र उलटून गेलेली आहे. तुम्ही निवांत झोप काढा. उद्या सकाळी घरातील सर्वांशी तुमची गाठ पडेल.' ती स्त्री थंडपणे बोलली आणि दालनात शिरलेल्या उदयसिंहाने सर्वत्र नजर फिरवायला सुरवात केली.

'तुम्हाला भूक लागलीय ?' अचानक तिने विचारले आणि नकळत त्याने होकारार्थी मान हलवली. मान न हलवून सांगणार होता कुणाला ? भूक तर सडकून लागली होती आणि पोटात इतकी भूक असताना त्याला झोप येणे शक्य नव्हते.



'त्या ठिकाणी पाण्याने भरलेले भांडे आहे. त्या दाराने पुढे गेलात तर स्नानगृह आहे. स्नान करणार असाल तर स्नान करून घ्या तोवर मी खाण्याची व्यवस्था करते.' ती स्त्री आपुलकीने बोलली आणि त्याची प्रतिक्रिया समजून न घेताच सरळ दारातून बाहेर निघून गेली.

कितीतरी वेळ उदयसिंह चौहान भारावल्यागत उघड्या दाराकडे पाहत राहिला. त्याने पुन्हा एकदा त्या जागेवरून नजर फिरवली. एका बाजूला भव्य पलंग त्याने पाहिला. पलीकडच्या बंद दारावर त्याची नजर स्थिर झाली.

त्या नजरेत आता कोणतेही भाव नव्हते. आपण उगाच गोंधळलो आणि घाबरलो याची जाणीव त्याला झाली. त्याने बंद दार उघडले. आत अंधार होता. त्याच दालनात कोपऱ्यात खेचून ठेवलेल्या मशालीतील सर्वांत लहान मशाल त्यानं काढली. कोपऱ्यात जळणाऱ्या दिव्यावर ती पेटवली आणि ती घेऊन तो स्नानगृहात शिरला.

आता मात्र त्याला स्नान करण्याचा मोह आवरला नाही. स्नानगृहाचे दार बंद करून त्याने अंगावरचे कपडे काढून ते झाडायला सुरुवात केली. त्या कपड्यांवर जमलेली धूळ त्याने झटकली. घाईघाईत स्नान करून त्याने कपडे घातले. कोणत्याही क्षणी ती स्त्री येईल हा विचार त्याच्या मनात आला.

जेव्हा तो बाहेर आला तेव्हा पलंगाजवळच्या मेजावर त्याने दोन तबके ठेवलेली पाहिली. ती स्त्री येऊन गेली हे त्याच्या लक्षात आले. त्यात ठेवलेल्या दशम्या आणि चटणीवर त्याने भरपूर ताव मारला.

-आणि हात धुवून जेव्हा तो दालनात शिरला तेव्हा आपल्याला झोपेने घेरलेले आहे हे त्याच्या लक्षात आले.

तो पलंगावर पडला तेव्हा कोणतेही विचार त्याच्या मनांत नव्हते. पलंगावर पडल्या पडताच झोपेने त्याला घेरले. थंडपणे त्याने जेव्हा घोरायला सुरुवात केली तेव्हा मात्र दाराच्या बाहेर अस्पष्टशी हालचाल झाली. मघाच्याच स्त्रीने उघडे असलेले दार आवाज होऊ न देता बंद केले.

✦✦✦